| MHAH180031892021 | केस दाखल दिनांक | २३/११/२०२१ |
|---|---|---|
| | केस नोंदणी दिनांक | २३/११/२०२१ |
| | केस निकाल दिनांक | ०४/०५/२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०४ ०५ ११ |

भाग – अ
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (i) अन्वये)

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (कोर्ट क्र.३), राहुरी यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – आदित्य कृ. शिंदे)**

न्यायनिर्णय घोषीत दि. ०४/०५/२०२६

**(नियमित फौजदारी खटला क्र. ५९४/२०२१)** **निशाणी क्र. ५२**

गुन्हा नोंद क्र. I ८०९/२०२१, राहुरी पोलीस स्टेशन, राहुरी.

| | | | |
|---|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | : | | **महाराष्ट्र शासन** मार्फत<br>ठाणे अंमलदार, राहुरी पोलीस स्टेशन,<br>ता. राहुरी, जिल्हा –अहमदनगर. |
| अभियोग पक्षातर्फे | : | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. एस. गांधले. |
| आरोपी | : | १. | **अविनाश योहान कदम,**<br>वय–३५ वर्षे, धंदा–नोकरी. |
| | | २. | **कमल योहान कदम,**<br>वय–६५ वर्षे, धंदा–घरकाम. |
| | | ३. | **योहान सारजा कदम,**<br>वय–७४ वर्षे, धंदा–सुखवस्तु. |
| | | ४. | **मंजुशा एरीक गायकवाड,**<br>वय–४० वर्षे, धंदा–घरकाम. |
| | | ५. | **मनिषा सचिन गायकवाड,**<br>वय–४२ वर्षे, धंदा–घरकाम,<br>सर्व रा. १०४, कुलस्वामीनी वृंदावन स्पाईन सिटी मॉलजवळ सेक्टर नं. ९, मो. सी. प्राधिकरण पुणे, जि. पुणे. |
| आरोपी क्र. १ ते ५ तर्फे विधीज्ञ | : | | **ॲड. श्री. आर. बी. खरे** |

भाग – ब
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | दि. २६/०५/२०१३ रोजीच्या दोन महिन्यानंतर ते दि. १४/०९/२०१७ पर्यंत |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २२/०९/२०२१ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २३/११/२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | १३/०३/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १३/०३/२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | :– | ०४/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०४/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसदर्भात आदेशाचा दिनांक | :– | –– |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **अविनाश योहान कदम** | –– | –– | भा.द.वि. कलम ४९८(अ), ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | –– | –– |
| २. | **कमल योहान कदम** | –– | –– | –– | –– | –– | –– |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | **योहान सारजा कदम** | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ४. | **मंजुशा एरीक गायकवाड** | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ५. | **मनिषा सचिन गायकवाड** | -- | -- | -- | -- | -- | -- |

## न्यायनिर्णय

(घोषित केल्याचा दिनांक – ०४/०५/२०२६)

प्रस्तुत खटला आरोपींविरूध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४९८(अ), ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये उल्लंघन करुन पात्र गुन्हयाच्या शिक्षेसाठी संपरिक्षेस सामोरे जात आहेत.

२) **अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत अशी की,**

फिर्यादी पुजा हिला दि. १४/०९/२०१७ पासून आरोपी क्र. १ ते ५ यांनी तुला मुल होणार नाही तसेच, घरातील भांडे घेण्यासाठी वेळोवेळी पैसे घेवून ये असे म्हणून तिला वाईट वाईट शिवीगाळ केली. तसेच तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून, उपाशीपोटी ठेवले व तिला जिवे मारण्याची धमकी देवून तिचा शारिरीक व मानसिक छळ केला. तसेच, तिला व तिचा मुलगा नक्ष याला घरातुन हाकलुन दिले. म्हणून, फिर्यादीने आरोपींविरोधात प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

## अन्वेषण व दोषारोप

३) वरीलप्रमाणे फिर्याद प्राप्त होताच राहुरी पोलीस स्टेशनला गु. र. नं. I–८०९/२०२१, भारतीय दंड विधानाचे कलम ४९८(अ), ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला गेला. सदर गुन्हयाचा तपास हा पोलीस हवालदार श्री. पी. बी. शिरसाठ यांनी केलेला आहे. त्यांनी त्यांच्या तपासामध्ये साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपास पुर्ण होताच आरोपींविरोधात वरील कलमान्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४) आरोपी क्र. १ ते ५ विरूद्ध नि. क्र. २५ अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ४९८(अ), ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये चे उल्लंघन करुन पात्र

गुन्हयाच्या शिक्षेसाठी दोषारोप ठेवले व त्यातील मजकूर हा आरोपींना वाचून व समजावून सांगितला असता सदरचा गुन्हा त्यांनी मान्य व कबूल नसल्याचे सांगून संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. प्रस्तुत आरोपींविरूद्ध कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

## मुद्दे व निष्कर्ष

५) अभियोग पक्षाचा खटला, अभिलेखावरील पुरावा यावरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आले आहेत व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, दि. २६/०५/२०१३ रोजीच्या दोन महिन्यानंतर ते दि. १४/०९/२०१७ रोजी पर्यंत फिर्यादी पुजा ही तिचे सासरी नांदत असताना आरोपींनी संगनमत करून फिर्यादी पुजा हिला तिच्या माहेरवरून गाडी घेण्यासाठी रक्कम रूपये ५,००,०००/– ची मागणी करून तिचा शारिरीक व मानसिक छळ केला, म्हणून आरोपींनी **भारतीय दंड विधानाचे कलम ४९८–अ सह कलम ३४ अन्वये** शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली, म्हणून **भारतीय दंड विधानाचे कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये** शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा एखादा अपराध घडावा या उद्देशाने शिवीगाळ केली, म्हणुन आरोपींनी **भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये** शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादीस दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला, म्हणुन आरोपींनी **भारतीय दंड विधानाचे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये** शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |
| ५. | काय आदेश? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

६) अभियोग पक्षाने त्यांची बाजु सिध्द करण्यासाठी सदरील प्रकरणामध्ये साक्षीदार क्र. १ पुजा अविनाश कदम– फिर्यादी यांची साक्ष नि.क्र. ५० वर नोंदविण्यात आली.

**मुद्दे क्र. १ ते ४ साठी –**

७) मुद्दे क्र. १ ते ४ हे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेची व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरचे मुद्यांची कारणे एकत्रीतरित्या नोंदविण्यात येत आहे. साक्षीदार क्र. १ पुजा (निशाणी क्र. ५०) हिने तिच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, ती आरोपींना नातेवाईक असल्याकारणाने ओळखते. आरोपी क्र. १ अविनाश हे तिचे पती, आरोपी क्र. २ कमल हया सासु, आरोपी क्र. ३ योहान हे सासरे, आरोपी क्र. ४ मंजुशा व आरोपी क्र. ५ मनिषा हया तिच्या नणंदा आहेत. आरोपी क्र. १ सोबत तिचे लग्न दि. २६/०५/२०१३ रोजी झाले असल्याचे तिने सांगितले. आरोपींनी तिला घरातील भांडे घेण्यासाठी वेळोवेळी आई–वडीलांकडून पैसे आणण्यास सांगितले होते अथवा नाही हे तिला आठवत नसल्याचे तिने कथन केले आहे. आरोपींनी तिला शिवीगाळ व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून तिला व तिचा मुलगा नक्ष याला घरातुन हाकलुन दिले होते अथवा नाही हे तिला आठवत नसल्याचे तिने कथन केले आहे. तसेच, आरोपींनी तिचा शारिरीक व मानसिक छळ केला अथवा नाही हे तिला आठवत नसल्याचे तिने कथन केले आहे. तिने आरोपींविरूद्ध पोलीस स्टेशन मध्ये फिर्याद दिली होती अथवा नाही हे तिला आठवत नाही नसल्याचे तिने कथन केले आहे. सदरील साक्षीदाराने फिर्याद वरील केवळ तिची सही (नि.पी.१) ही ओळखली. परंतु, फिर्यादमधील मजकुर बरोबर नसुन तो तिच्या सांगण्याप्रमाणे नसल्याचे कथन केले आहे.

८) साक्षीदार क्र. १ पुजा (नि. क्र. ५०) यांनी अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने विव्दान सरकारी वकीलांनी त्यांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उलटतपाससदृश सुचक प्रश्न विचारले. परंतु, त्यामध्ये देखील आरोपींविरूद्ध कुठलाही पुरावा आला नाही. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ पुजा हिला फिर्यादीतील अधोरेखांकित भाग 'अ' वाचुन दाखविण्यात आला. परंतु, तो तिने पोलीसांना सांगितला नसल्याचे कथन केले आहे. साक्षीदाराने तिच्या व आरोपींच्या दरम्यान न्यायालयासमोर तडजोड झाली असल्याचे सांगितले. तसेच, आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे देखील त्यांनी सांगितले.

९) फिर्यादी यांनी न्यायालयात नि. क्र. ४९ च्या पुरशिसव्दारे कळविले की, त्यांनी आपआपसात तडजोड केली आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणातील गुन्हे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३२० (१) व (२) मध्ये आपसात तडजोड न करता येण्यासारखे असल्याने फिर्यादी व आरोपी यांच्या दरम्यान झालेल्या तडजोडीला कायदेशीर मान्यता व परवानगी देण्यात आली नाही.

१०) फिर्यादी यांनी त्यांच्यामध्ये व आरोपींदरम्यान सदरचे प्रकरण आपसात मिटले असल्याचे व ते पुढे चालविणेचे नसल्याचे त्यांचे एकुण पुराव्याच्या अवलोकनार्थ समजते. फिर्यादी हिच्या पुराव्याचे एकंदरीत अवलोकन केले असता आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपाबद्दल कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला दिसुन येत नाही. अभियोग पक्षाच्या संपुर्ण पुराव्याचे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच आरोपींच्या विव्दान वकीलांचे युक्तीवाद एकत्रीतरित्या ऐकल्यानंतर आरोपींविरुध्द वर नमुद गुन्हे सबळ पुराव्याविना सिध्द होत नसल्याचे दिसुन येते. वर नमुद मुद्दे सिध्द करण्यासाठी कुठलाही पुरावा उपलब्ध नाही. सबब, मुद्दे क्र. १ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ साठी–</u>**

११) मुद्दे क्र. १ ते ४ साठी नोंदविलेली कारणमिमांसा विचारात घेता अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हयाचे घटक सिध्द केले नसल्याने सबळ पुराव्याविना आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत केल्याचे सिध्द होत नाही. मी मुद्दे क्र. १ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले

आहेत. आरोपींविरुध्द सबळ पुरावा न आल्याने आरोपींची वर नमुद गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित वाटते. सबब, मुद्दे क्र. १ ते ४ च्या निष्कर्षान्वये व वर नमुद न्यायनिर्णयाचा विचार करीता, मुद्दा क्र. ५ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतोः–

**आदेश**

| | |
|---|---|
| १ | **आरोपी क्र. १ ते ५** यांस भारतीय दंड विधानाचे कलम ४९८(अ), ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वयेचे पात्र शिक्षेच्या गुन्हयासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २ | आरोपीचे जामिन व बंधपत्र हे रद्द करण्यात येते. आरोपीस मुक्त करण्यात येत आहे. |
| ३ | या न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील झाल्यास त्याकामी हजर होणे करीता आरोपी क्र. १ ते ५ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ नुसार रुपये १५,०००/- चे प्रत्येकी वैयक्तीक व जामीनदाराचे बंधपत्र दयावयाचे आहे. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
ADITYA KRISHNA SHINDE
2026.05.04 17:20:47 +0530

दिनांक – ०४/०५/२०२६
राहुरी.

**(आदित्य कृ. शिंदे)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(न्यायालय क्र. ३), राहुरी.

**भाग क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | पुजा अविनाश कदम | फिर्यादी | ५० |

(ब) बचाव पक्षातर्फे साक्षीदार : निरंक.

(क) न्यायालयातर्फे साक्षीदार : निरंक.

## फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालयीन निशाणी क्रमांक

**(अ) अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | नि. पी–१ | फिर्यादमधील केवळ फिर्यादीची सही |

(ब) बचाव पक्षातर्फे निशाणी : निरंक.

(क) न्यायालयातर्फे निशाणी : निरंक.

(ड) महत्वपुर्ण वस्तु : निरंक.

ADITYA
KRISHNA
SHINDE
2026.05.04
17:20:54
+0530

दिनांक – ०४/०५/२०२६

राहुरी.

**(आदित्य कृ. शिंदे)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(न्यायालय क्र. ३), राहुरी.

## प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी. डी. एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | ए. पी. कळमकर |
| न्यायालयाचे नाव | : | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.३, राहुरी. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०४/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०४/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०४/०५/२०२६ |